सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका,
जावक क्र.साप्रवि/आस्था-४/3538
दि.24/08/२०२०

मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) तथा
अध्यक्ष पुनर्विलोकन समिती
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सविनय सादर--

विषय : वयाच्या ५०/५५ वर्षापलीकडे/अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षाच्या कालावधीपुढे सेवेत राहण्याची पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांची पात्रापात्रता अजमाविण्याबाबत.

संदर्भ : १) महापालिका आयुक्त कार्यालय, जा.क्र.३२५६ दिनांक १८/१/१८ चे कार्यालयीन आदेश प-8
२) अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय, जा.क्र.अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/प्र४/ ६०२ दिनांक ०६/०५/२०२० चे कार्यालयीन आदेश. प-6
३) उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ जा.क्र.२०५१ दि. ०८/०७/२०२० नि-3,e

संदर्भ क्र. १ चे आदेशांप्रमाणे अंमलबजावणीकामी वर्ग अ व ब च्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत वयाची ५० वर्षे पूर्ण होतेवेळी किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण होतेवेळी, यापैकी जे प्रथम घडेल त्यावेळी आणि वर्ग क ते ड च्या कर्मचाऱ्यांच्या वयाच्या ५५ व्या वर्षी किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण होतेवेळी, यापैकी जे प्रथम घडेल त्यावेळी, करावयाच्या पुनर्विलोकनासाठी शारीरिक क्षमता, निर्विवाद सचोटी व "चांगला" पेक्षा कमी नाही असा अभिलेख हा निकष विहित करण्यात आला आहे. प-8

उपरोक्त बाबी विचारात घेऊन पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/सेवकांची दि.३१ मार्च २०२० अखेर पात्रापात्रता अजमावून त्यांची सेवा चालू ठेवणे अथवा समाप्त करणेबाबत अभिवेदन समितीचे इतिवृत्त सादर करणेबाबत संदर्भ क्र. २ चे कार्यालयीन आदेशान्वये आदेश प्रसृत करण्यात आले होते. प-6

वरील आदेश विचारात घेऊन, धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालयाचे खातेप्रमुखांचे अध्यक्षतेखाली अभिवेदन समिती गठीत केलेली असून, समितीचे सदस्य, सदस्य सचिव समिती अध्यक्ष यांनी निर्देशित केलेले आहेत. त्यानुसार धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालयाकडील वर्ग – ब (२) असलेल्या सेवकांपैकी दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत ' निरंक ' सेवक असून, त्याबाबतचा निरंक अहवाल माहितीस्तव सादर करीत आहोत. तसेच वर्ग 'क' (३) मधील ४ पात्र सेवक आहेत. त्यांची माहिती विहित नमुन्यात संदर्भ क्र. ३ चे निवेदनासोबत सादर केली आहे. प-10 नि-5 नि-12 नि-3,e

महापालिका सहाय्यक आयुक्त, धनकवडी सहकारनगर कार्यालयाकडील गठीत केलेल्या अभिवेदन समितीने वस्तुस्थितीचे अवलोकन करून विषयाचे अनुषंगाने पात्र अपात्र बाबत शिफारस केलेली असलेबाबत संदर्भ क्र. ३ चे निवेदनामध्ये नमूद केले आहे. नि-3,e